# Marathi (109)
# Sample Paper- 2018
# Class-XII

---

## SECTION- A (COMPREHENTION)

**1 खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.**

महाबळेश्वरात एकाच ठिकाणाहून पाच नद्या उगम पावतात आणि डोंगरातून वेगवेगळ्या अंगांनी वाटा काढीत, सपाटीवरून धावताना दिसतात. या पाच भगिनींचे एकमेकीवरचे प्रेम मोठे अमर्याद. जन्माच्या ठिकाणी त्या आपले आगळे अस्तित्व दाखवतात,पण ते क्षणभरच. फुगडीचा फेर त्यांनी धरला आहे, असे दिसावे,तोच त्या एकजीव होऊन जातात आणि गोमुखातून बाहेर उडी घेतात. उडी घेताना यातील कृष्णा कोणती, वेण्णा कोणती,कोयना भागिरथी, सरस्वती कोणती, हे ओळखता येत नाही दिसते, ती एक धार. गोमुखातून ही स्वच्छ धार कुंडात उडी घेते आणि पुन्हा जमिनीच्या खालून वाटा काढीत पाच बाजूंनी पाच भगिनी निघून जातात. पुढे कुठेतरी मग डोंगरावरून खाली उडी घेताना दिसतात. भागिरथी आणि सरस्वती गुप्तमार्गाने वाहत राहूनच आपल्या मोठ्या बहिणीला रस्त्यात कुठेतरी भेटतात, अशी अख्यायिका आहे. परंतु एक गोष्ट मात्र खरी, उगमापासून काही मैलाच्या अंतरावरच पाचही भगिनींचा मिलाफ होतो आणि कराडपासून पुढे या सर्वजणी कृष्णामय बनूनच सागराला भेटायला जातात. जरा थोराड अंगाची कोयना कराडला आपल्या भगिनीला, कृष्णामाईला कडकडून भेटते संगमावर मग आनंदाचा कल्लोळ होतो. या ठिकाणी पोहोचलेल्या सर्व जणींचे पंचामृत मोठया पात्रात साठते आणि चविष्ट सुगंधित बनून पांथस्थांची तहान शमविण्यासाठी पुढे आणि पुढेच, महाराष्ट्र ओलांडून आंध्रात पोहोचते. पाचही भगिनीचे सागराशी मग एकाच वेळी मीलन होऊन जाते.

प्रश्न ः

1 महाबळेश्वरात एकाच ठिकाणाहून कोणत्या पाच नद्या उगम पावतात ? 3

2 भागिरथी आणि सरस्वती बाबतीत कोणती अख्यायिका आहे ? 3

3 कराडला संगमावर आनंदाचा कल्लोळ का होतो ? 3

4 पाचही भगिनीचे एकाच वेळी कोणा बरोबर मीलन होते ? 1

## **SECTION-B** ( WRITING)

**2 खालीलपैकी एका विषयावर 25 ते 30 ओळीत निबंध लिहा. 15**

1 खाजगी शिकवणी वर्ग असावेत की नसावेत

2 माझ्या स्वप्नातील भारत

3 मोबाईलचे विद्यार्थी जीवना वरील दुष्पपरिणाम

## **SECTION-C** (GRAMMAR)

**3 खालीलपैकी कोणत्याही पाच विधानामध्ये कंसातील सूचनेप्रमाणे बदल करा. 15**

1 अनघा रोज एक सत्कार्य कर. (विद्यर्थ करा)

2 राजू झाडाला पाणी घालतो. (कर्म**णी करा**)

3 विभावरीने आपली जुनी पुस्तके गरजुंना वाटली. (कर्तरी करा)

4 समोरचे भयानक दृश्य पाहून मदनच्या पोटात भीतीचा गोळा आला (वाक्प्रचाराचा अर्थ वापरून वाक्य पुन्हा लिहा)

5 मुलांनी रोज थोडेतरी मैदानी खेळ खेळावे. (आज्ञर्थ करा)

6 स्त्रियांनी वड पुजला. (भावे करा)

7 पोलीसांची गुन्हेगारावर चांगलीच पाळत होती. (वाक्प्रचाराचा अर्थ वापरून वाक्य पुन्हा लिहा)

**4 अ वचन बदला-** 1 जनावर 2 चहा **2**

**ब क्रियाविशेषणे बनवा -** 1 शिवार 2 चार 3 घळई **3**

**5 कंसातील शब्दांची योग्य रूपे वापरून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही पाच) 5**

1 (जग) प्रेम अर्पावे.

2 आजकाल नेत्यांचे (समाज) लक्ष राहिले नाही.

3 काश्मिर प्रश्न सर्वांनी (गंभीर) सोडवावा.

4 प्रत्येकाने (वाट) काटे वेचायला हवेत.

5 सर्व विद्यार्थ्यांनी मिळून (तलाव) घाण व कचरा काढून तलाव स्वच्छ केला.

6 रोज सकाळी थोडे तरी (धावणे).

7 (----!) किती विशाल आहे तो धबधबा.

## **SECTION- D** (LITERATURE)

6 **अ पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा** **10**

1 मुलांनी स्वप्न पाहण्याचा सल्ला अब्दुल कलामांनी कसा दिला ?

2 फामरोझचे आयुष्य कसे सार्थकी लागले ? स्पष्ट करा.

3 यंत्रमानव सांगकाम्या आहे हे उदाहरण देऊन स्पष्ट करा.

**ब पुढीलपैकी कोणत्याही दोन अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **10**

1"ओन्ली वन मोअर रिक्वेस्ट सर. . प्लीज टेक केअर ऑफ माय बॉइज अँड गर्ल्स. डोंट लेट देम डाय!"

2 'पण तिथं आई होती. मायमाखल्या नजरेनं बघणारी अन् तुपात भिजलेल्या शब्दांनी बोलणारी'

3 'कारण हालहाल होऊन मरण्यापेक्षा विष खाऊन मेलेलं बरं'

7 **अ) पुढीलपैकी कोणत्याही दोन अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **10**

1 नित्य मुलीमुला शाळेत घालावे। अन्नदान द्यावे। विद्यार्थ्यास।

2 खडक काजळी घोटुनि तुमचे मनगट बाहू घडलेले
कडेकपारी मधील वणवे उरांत तुमच्या दडलेले

3 'रांधा वाढा उष्टी काढा' कपाळावर गोंदण
राबण्याचा गाव तिला लग्नात मिळाला आंदण !

**ब) खालीलपैकी कोणत्याही दोन पदयांशातील अलंकार ओळखा** **05**

1 ते शितलोपचारे जागी झाली हळूच मग बोले ।
औषध नलगे मजला परिसूनी माता बरे म्हणूनी डोले।

2 माझी आई अशी होती ।जशी असतेच आई।

3 तू माऊलीहून मायाळ। चंद्राहूनि शितळ।
पाणियाहूनि पातळ।कल्लोळ प्रेमाचा।

**8 अ)** मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी लागते ? 10

किंवा

आर.जे. (रेडिओ जॉकी)कडे कोणती स्वभाव वैशिष्टे असायला हवीत ?

**ब)** दूरदर्शनरील जाहिरातीचा उपयोग सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने कसा करून घ्याल? 05